# नागपूर

# पं चा य त न

परम पूजनीय ब्रह्मश्री

## दत्तमहाराज कवीश्वर

सहस्रचंद्रदर्शनशांती महोत्सव निमित्त विनामुल्य सप्रेम भेट

( खाजगी वितरणासाठी )

प. पू. श्रींच्या सहस्त्रचन्द्र दर्शन शांति समारोहाच्या निमित्ताने ही छोटीशी वाङ्मय सेवा त्यांच्या चरणी अर्पण. पू. श्रींच्या मुखातून ऐकायला मिळालेले दिव्यामृत सर्वांना वाचायला जरी मिळाले तरी श्रोत्यांप्रमाणे वाचक कृतार्थ होतील यात शंका नाही. यात श्रींचे शब्द जसे न् तसे उतरविण्याचा प्रयत्न केला आहे. तरी सुद्धा काही चुका होण्याची शक्यता आहे. वाचकांनी कृपया त्याकडे दुर्लक्ष करुन श्रींच्या उपदेशाकडे लक्ष द्यावे ही नम्र विनंती.

वेदमूर्ती श्री कृष्णा आर्वीकर यांनी हे प्रवचन उपलब्ध करुन दिल्याबद्दल संग्राहक त्यांचा ऋणी आहे.

॥ श्रीगणेशदत्त गुरुभ्यो नमः ॥

**विद्यावन्तं यशस्वन्तं लक्ष्मीवन्तं जनं कुरु ।**
**रुपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि ।।**

देवी पंचायतन याग आजपासून सुरु झाला आहे. आर्वीकर पितापुत्र धर्मशील, आचरणसंपन्न आहेत. आणि इतरही विद्वान मडळींनी यात भाग घेतला आहे. सर्व मंडळी विधिज्ञ आहेत त्यामुळे ज्ञानपूर्वक जर कर्म झाले तर त्याचे विशेष फळ मिळते.

**यदेव विद्यया करोति ।**
**तदेव वीर्यवत्तर भवति ।।**

एके ठिकाणी ज्ञान आणि कर्माचा समुच्चय आवश्यक आहे. ब्रह्मज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय असंभवनीय आहे असं आचार्यांनी सांगितलेले आहे. येथे कर्माचे ज्ञान आणि नंतर त्याचे कर्मफल. हे ज्ञान कर्मानुष्ठाना करिताच आहे त्या प्रमाणे हे ज्ञानपूर्वक कर्मानुष्ठान चालू आहे. प्रधान देवता, परिवार देवता वगैरे सर्वही देवतांची स्थापना झालेली आहे.

भगवतीचे अधिष्ठान या ठिकाणी आहेच आहे. अशा प्रसंगी काही वाङमय सेवा व्हावी अशी आज्ञा संचालक मडळींनी केल्यामुळे यथामति सेवा करण्याचा योग आलेला आहे.

ईश्वराचे स्वरुप " ईश्वरी सर्व भूतानाम " किंवा " ईश्वर: सर्वभूतानाम् " अशा दोन्ही प्रकारांनी वर्णन केलेलं आहे. नियामक शक्ति ईश्वररुपानेही आहे व ईश्वरस्वरुपानेही दाखिवली आहे सद्गुरु वासुदेवानंद सरस्वति स्वामी महाराजांची एक आरती आहे पचायतनाची आरती म्हणून त्यांनी केलेली आहे त्या आरतीमध्ये पचायतनाचे स्वरुप काय आहे. पांच ईश्वर भिन्न भिन्न आहेत कि एकच आहे ? कार्य भिन्न भिन्न आहेत परंतु ईश्वरस्वरुप एकच आहे. असेच ध्यान त्यांनी त्या आरतीमध्ये केलेले आहे. भेद नाहीसा व्हावा असा उपक्रम त्यात आहे.

**जय सवितर्गजमुख नगतनये ईश हरे ।**
**भेदावलिमपनेतुं ध्याये हृत्कुहरे ।।**

ही भेदावली घालवण्याकरता मी ध्यान करतो. सविता, गजमुख, नगतनया ईश आणि हरि या पांचही स्वरुपाचे चिंतन हा भेद जाण्या करता मी करतो, असे म्हणत आहेत. महावाक्याचा अर्थबोध होण्याकरता पदार्थ ज्ञानाची जरुरी आहे. वाक्यार्थ बोधाला पदार्थज्ञान लागते परंतु पदार्थज्ञान सुद्धा शुद्ध पाहिजे- तत्पदार्थ शुद्धि नसेल ज्ञान नाही तर शुद्ध ज्ञान ! ज्ञानामध्ये सुद्धा काही शुद्धा शुद्धि राहाते. तर त्या पदार्थाची शुद्धि होण्याकरता म्हणून हे

चितन महाराजांनी केलेलेआहे भेदावली दुर करायची मग त्या भेदावलीचेच चितन करायचे आहे. अधिष्ठान साहित्येन चितन करायचे आहे लक्षार्थ चितन करायचे आहे, शूद्ध पदार्थ किंवा अशूद्ध पदार्थ म्हणजे लक्षार्थ घेतला जातो

गजेन्द्राख्यानामध्ये गजेंद्राने स्तुति केली. तो आर्तभक्त आहे. तत्पदार्थ शुद्धि ज्याची झाली असा हा मोठा भक्त दिसतोय--

नमो भगवते तस्मैः यत् एतद् चिदात्मकम ।
पुरुषाय आदिनीजाय परेशाय अधिधीमहि ।।

असा उपक्रम त्या स्तुतित आहे नामोल्लेखन आहे. फक्त कार्याचा उल्लेख आहे. संपूर्ण विश्व ज्याच्या स्वरुपामूळे ज्याच्या सान्निध्यामूळे कार्य प्रवण दिसते आहे ते आहे. त्याचा परिणाम शूकाचार्य महाराजांनी असा वर्णन केला कि तळमळीने त्याने हाक मारली प्रार्थना केली स्तुति केली सगळे उत्तम सिद्धांत त्यात मांडले तर पदार्थ शुद्धिही त्यात दिसून येते परन्तु बाकी कोणीही देव आले नाहीत. संकटातून सोडविण्याची शक्ति काय देवात नाही असे नाही नक्रापासून काय कोणीही मूक्त केले असते. परन्तु यानेही विष्णु. हरि अथवा विशिष्ट अशा नांवाचा उल्लेख करुन चितन करुन प्रार्थना केली नाही परन्तु सर्वात्मक अशा प्रकारचे श्रीहरि त्या ठिकाणी प्रगट झाले

साधकाच्या अंत:करणामध्ये भेद बूद्धि आहे ती शूद्ध होता होता ज्यावेळी तत्पदार्थ शुद्धि होईल नन्तर वाक्यार्थ बोध आहे. म्हणून महाराजांनी

जय सवितः गजमुख नगतनये ईश हरे ।
भेदावलिमपनेतुं ध्याये हृत्कुहरे ।।

अस चितन. कार्य वेगळी वेगळी दाखवलीत मात्र. सर्व व्यापी जे चैतन्य आहे त्या चैतन्यामध्ये भेद संभवत नाही. परन्तु विशिष्ट कार्यावरुन भेद मानला जातो. म्हणून पंच रुपाने कोणची कोणची ईश्वराची कार्ये चाललेली आहेत हे त्याच्या मध्ये महाराजांनी दाखिवल आहे.

सवितृ स्वरूपाच चितन करताना महाराज म्हणताहेत--

बुद्धि प्रेरक सवितुर्नः सिद्धम् रुपम् ।
ध्याये हृद्यहृत् श्रेष्ठं देवस्य च रुपम् ।।

चिंतन मी करतो, ही भेदावली नको आहे. एकच आहे. सविता, गजमुख, नगतनया हरि हे सगळ एक आहे

गायत्री महामंत्राचा जो अर्थ आहे त्यात शुद्ध तत्पदार्थ दाखवलेला आहे बुद्धि प्रेरक असे ते स्वरुप आहे. ईश्वर एक आहे. पण त्याचे सविता हे जे स्वरुप आहे ते बुद्धिला प्रेरणा करणारे आहे सविता स्वरुप जो ईश्वर आहे तो बुद्धिला प्रेरणा करतो.

## ददामि बुद्धि योगंतम् येन माम् उपयांतिते ।

भगवान सांगताहेत बुद्धि कर्मानुसारीणी हाही एक सिद्धान्त आहे. जशी कर्मे झाली असतील त्या प्रमाणें बुद्धि उत्पन्न होते. कर्तृत्व जीवाचे आहे. इथे जीवाला काही तक्रार करता येणार नाही. त्यानेंच कर्म केलेली आहेंत. कर्मानुसारिणी बुद्धि ही वेगळी मानावी लागते आणि

## ददामि बुद्धि योग तम् येन माम् उपयांति ते ।

ही जी ईश्वरदत्त बुद्धि आहे ती वेगळी मानायला पाहिजे. योगक्षेमम् वहाम्यहम् ही भगवंतांची प्रतिज्ञा आहे. मोठे कार्य आहे. योगक्षेम शब्दाचा अर्थ संसारा पुरताच मर्यादित नाही. परमार्थिक दृष्टचा सुद्धा योगक्षेमाची जरुरी आहे

अनेक भूमिका परमार्थ साधनात आहेत. त्या करता ईश्वराची उपासना ही योग शास्त्रकारांनी सुद्धा आवश्यक मानलेली आहे. प्रयत्नवाद आहे. योगशास्त्र म्हणजे पुरुष प्रयत्न आहे. परन्तु मध्ये मध्ये येणारे जे अतराय आहेंत ते अंतराय दूर होण्याकरता ईश्वराची उपासना पाहिजे

ईश्वर परिधानाचे फल योगशास्त्रकारांनी दाखविले आहें. आकस्मिक अंतरायमध्ये उत्पन्न होणे. साधनाभ्यास चाललेला आहे तो काही या काला पुरताच आहे अस नाही. कर्मात्मक साधना मध्ये काही काळाची गणना असते तीन दिवस, पांच दिवस, सात दिवस यथाशक्ति आणखी काळ घेंतात परन्तु योग साधनामध्ये जी सिद्धी करुन घ्यायच ये त्याला काळाचे नियंत्रण नाही दीर्घ काळ पर्यन्त ते चालले पाहिजे अस म्हणतात कारण कर्मानु–सारिणी बुद्धि घेऊन, त्या भूमिकेवरुनच जीवाचा साधनाभ्यास चाललेला आहे कोणाची बुद्धि कशी होईल कोणचे कर्म कोणत्या वेळेला होईल, कोणत्या वेळेला त्याचा फलोद्भव होईल काही सागता येत नाही. त्यामुळे ईश्वराची उपासना जरुर आहे अस म्हणतात.

## ददामि बुद्धियोगंतम् ---

हा बुद्धियोग त्याच्या पासून मिळायचा आहे कर्मानुसारीणी बुद्धि हा जरी सिद्धांत घतला तरी त्याने ईश्वशक्तिचे महत्व दाखिवले आहे. ददामि बुद्धि यात भगवान् सांगतात. हे

कोणाच्या कर्मात केव्हा फलोद्भव व्हायचा हे सर्व ज्ञान त्याना ( ईश्वराला ) आहे एका जन्माचीच नव्हे तर अनन्त जन्मांची कर्मे जीवाकडून झाली आहेत व क्रियमाण कर्माची त्यात भर पडत आहे. असे चालू असताना सुद्धा त्यातल्या कोणच्या कर्मांचा फलोद्भव व्हायचा हें ज्ञान त्या परमात्म्याला आहे. त्यामुळें बुद्धी कर्मानुसारीणी हा जरीं सिद्धान्त मुख्य घेतला तरी सुद्धा कोणत्या कर्माला बुभूर्त करणें हें तरी स्वातंत्र्य आहें कि नाही ईश्वराला ! तो संत आहे, कर्मफल प्रसंषिता आहे. तेव्हां बुद्धि प्रेरणा करण्या बरोबरच योगक्षेम संपादकत्व हे ही त्याच्यामध्ये आहे. कर्मफल प्रसविता त्याच्या शिवाय कसे होणार ?

बुद्धि प्रेरक असे जे परमात्म्याचे स्वरूप आहे ते या ठिकाणीं दाखविले आहे. बुद्धि प्रेरक ईश्वर म्हणजे सविता प्रकाशरूप आहे. प्रकाशमान् आहे. चक्षुर्वैसिद्ध श्रेष्ठ स्वरूप आहे. बुद्धि प्रेरणा करणे हे फार महत्वाचे काम आहे. कर्मामध्ये सुद्धा कमी जास्तपणा हा त्याच्या संकल्पा प्रमाणे होंऊ शकतो.

**भोक्तारं यज्ञतमसा सर्व लोक महेश्वरम् ।**
**सुहृदम् सर्व भूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ।।**

भगवान् सांगताहेत ईश्वर असा आहे सगुण ईश्वराचे स्वरूप सांगताहेत. पतिरिक्तत्व हा गुण मानून त्या प्रमाणे दाखवले आहे. तसच सर्व कर्माचे भोक्तृत्व हे ईश्वराच कार्य आहे. कर्तुत्व जीवाला आणि भोक्तृत्व ईश्वराला हे कसे संभवनीय आहे ? जो कर्ता तोच भोक्ता असायला पाहिजे ना !

संकल्पामध्ये फलाचाही उल्लेख केला जातो. तसेच भागवत मध्ये वृषभ देवांचे जे ज्येष्ठ पुत्र आहेत त्यांना अनेक यज्ञ केले अस वर्णन शुकाचार्य महाराजानं केलें अहें ते कर्मानुष्ठान चालू असताना त्यांची दृष्टी कशी होती याच वर्णन करताहेंत यज्ञकर्मांचा सुरवात त्याने केली आहे कर्ता तो आहे त्याच फळ म्हणजे ईश्वराचे फळ आहे भगवन्ताच्या विश्वरूपाचेही तो चिंतन करतो आहे, त्यावेळेला सर्व देवता या पूज वगाच्या ठिकाणी आहेत सर्व देवांचा नियामक तो असल्यामळे साक्षात कर्ता तो आहे. सगळे देव नियम्य आहेत अर्थात हे अपूर्व क्रियाफळ त्याचे आहे हे त्याला – हिरण्य कश्यिपूला समजले आहें तो आपल्या सर्व अनुयायाना – असुराना सागतो आहें तुम्हा अगोदर जाऊन ही सगळी ब्राह्मणाचा कर्मे बंद करा. कारण ते ब्राह्मण कर्ता साक्षात ईश्वर आहें या शुद्ध भावनेने कर्म करुन सर्व क्रिया फळ त्या ईश्वराला अर्पण करतात. हें सर्व फळ त्या विष्णूला मिळते. तो विष्णुचे बाह्य स्वरुपच ( दृष्य स्वरूपच ) समजतो आहे इतर विष्णू स्वरुप जाणून बोलत नाहीये तो काही काही सिद्धान्त असुरांनी स्वीकारले आहेत. "कलात्मश्वत्व नित्यत्व" हा सिद्धान्त हिरण्यकशिपूला मान्य होता आत्मनैपुण्य भलितकशाया: हे कर्माचे नैपुण्य आहे याग कर्मसुकौशलम् हे कौशल्य त्यांनी दाखवले आहे त्यामुळे सर्व यज्ञादिक कर्मांचा भोक्ता परमात्मा आहे हे ज्ञान पाहिजे.

त्याच्या नन्तर "सर्व लोक महेश्वरम् " सर्वहि ब्रह्मादि देवांचा नियामक तो आहे. मुख्य नियामक आहे. सुहृदम सर्व भूतानां असहि आहें. सुहृद शद्वाचा अर्थ आचार्य महाराजांनी केलेला आहे--

## प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम् ।

त्याला प्रत्युपकाराची काय आवश्यकता आहे ? आपण जर भक्तालां काहि दिले तर भक्त माझ्या करता काय करणार आहें ? अस अगोदर म्हणत नाही प्रल्हादजी म्हणाले मलाहि काही इच्छा नाहि आणि तुम्हालाहि काहि अपेक्षा नाहं. काय करतो आहें हा आपल्या करता ? अस तुम्हालाहि वाटत नाही.

हा जो वात्सल्यभाव आहे, भक्तियोगाची सर्व प्रवृत्ती यामुळे झाली आहे भगवंतांच्या या प्रेरक स्वरूपाला बुद्धि दातृत्व म्हणतात योगक्षेम निर्वाहा प्रापंचिक योगक्षेम घ्यावे किंवा पारमार्थिक योगक्षेम मुख्य, त्या योगक्षेम निर्वाहात अशा प्रकारची बुद्धि ज्याच्यापासून मिळते, पुन्हा काही अपेक्षा नाहि. हे केवढे दान आहे !

## दत्तो मया तेह मितीह दत्तः

अस दत्तत्रेयांचे वर्णन करतात. आत्मनिवेदन भक्तांनी करायचे आहे पण इथे देवानेच अत्रिऋषिना आत्मदान करुन टाकल आहे म्हणून ' दत्त ' हे नांव पडले म्हणजे हे जे भक्ता-बद्दल वात्सल्य आहे तेहि या मध्ये सूचित केल आहे. वात्सल्य शब्दांचा अर्थ वल्लभाचार्यांनी एके ठिकाणी केलेला आहे.

## आसित जन दोषेषु गुणत्व बुद्धिः ।

ही वात्सल्याची व्याख्या केली आहे. त्याचे जे भक्त असतं ल त्याचे दोष नाही फक्त गुणच देवाला दिसतात हाहि वात्सल्यपदार्थ आहे त्यात दोष दिसत नाहीत हे सगळे गुण आहेत. " मधुराधिपतेरखिलम् मधु " " असे भक्त म्हणतो आहे परन्तु भगवान् म्हणताहेत कि भक्ताचेसुद्धा सगळेच चांगल आहे. कारण त्याच्या पाठीमागे त्याच प्रेम आहे. परन्तु शास्त्रीय दृष्टीनें कदाचित् हा भ्रम होईल, भ्रांती होईल. गुण नसताना गुणत्व बुद्धि देवाला आहे म्हणजे देवाला भ्रांति आहे. असे म्हणावे लागेल म्हणून दुसरी व्याख्या सांगितली आहे. "तत दोष अदर्शनम वा वात्सल्यम " भक्ताचे दोष त्याला दिसतच नाहींत.

तर अशा दृष्टीने बुद्धिला प्रेरणा करणें. त्याचे कर्म कोणतेही असले तरी तो त्यात कमी जास्तपणा करु शकतो. नाही तरी शेंवटी ब्रह्म साक्षात्कार झाल्यानन्तर सगळ्या कर्माचा

क्षयच व्हायचा आहे कर्मशक्ति माठी आहे. पण सगळया कर्माचे फल थोडच मिळते ! शेवटी ज्ञान झाल्यावर सर्व कर्माचा तत्काळ क्षय होऊन जातो हे ज्ञानच महात्म्य आहे. पुण्यही गेली व पापेही गेली. अशी ही काही कर्मे असतिल. कुठल्या तरी जन्मात शुद्ध कर्मे झाली असतील. गुरुचरित्रातील त्या कथेत वामदेवाला खाण्यासाठी आलेल्या ब्रह्मराक्षसाने पंचविसाव्या जन्मात कर्म केले होते. राजस कर्म असेल तरी त्याचे फल मिळते तामस कर्माचे मात्र फल नाही परन्तु ते राजस कर्म यथाविधी केल्यामुळे सकाम जरी असले तरी त्याचे फल मिळते. अनेक जन्मांची कर्मे त्या सर्वसाक्षी बुद्धि प्रेरकाच्या समोर आहेत. त्यामुळे परमार्थाला अनुकूल अशी बुद्धि प्रेरणा त्याच्याकडून होऊ शकते.

पत्नीला कधीही माहेरी न पाठवणारे तुळसीदास ! पण त्या स्त्रीच्याच एका वाक्या-वरुन निवृत्त झाले. हे कस काय झाल ? याचे उत्तर काही देता येत नाही. "ददामि बुद्धि योगंतम् " मानलच पाहिजे कर्मानुसारीणी बुद्धि घेऊन आलेले विद्वान असुन सूद्धा स्त्रीच्या आसक्तित सापडलेच होते आरंभाला.

## बुद्धिप्रेरक सवितुर्नः सिद्धम् रुपम् ।

आणि त्याच ध्यान या रुपानें आहे. हे सविताचे वर्णन महाराजांनी केल आहे सवितारुपी परमात्मा बुद्धिला प्रेरणा करत असतो. परमार्थी मध्येहि जी अपेक्षित बुद्धि आहे त्यालाही प्रेरणा करीत असतो. जीवात्मा कर्मानुसारीणी बुद्धि जरी घेऊन जन्माला आलेला असतो तरी सुद्धा परमार्थिक बुद्धि प्रेरणा करण्याची शक्ति त्याच्या जवळ आहे सूर्य नारायण हे सविता-स्वरुप म्हणजे बुद्धि प्रेरक ईश्वरच आहे ईश्वराचे कार्य म्हणून सविता हे एक स्वरुप दाखवल आहे

आता गजमुख गणेशाच स्वरुप वर्णन करताना गणाचा पति म्हणजे पालक गण म्हणजे प्राण, इंद्रिय, हृदय, बुद्धि सर्पूर्ण सूक्ष्म शरीर घेतला आहे सूक्ष्म शरीरांतर्गत बुद्धितत्वाला प्रेरणा करणे हे कार्य सवितारुपी ईश्वराचे आहे त्या सर्वही गणाचे रक्षण करणारा परमात्मा म्हणजे गणपति आहे. मूळ तत्वापर्यंन्त जाऊन महाराज ध्यान करताहेत. म्हणजे भेदाचा काय संबध ? गणपति निराळा, सविता निराळी, जगदंबा निराळी असे नाही. पंच प्राण आहेत. पंचज्ञानेंद्रिय आहेत पंचकर्मेंद्रिय आहेत मन आणि बुद्धि सप्तदर्शतत्वात्मक जे लिंग शरीर आहे. ज्याच्यामुळे अनेक जन्म होतात. नविन स्थूल देहाचा संबध म्हणजे जन्म आहे. आणि स्थूल व सूक्ष्म शरीराचा वियोग होणें म्हणजे मृत्यू आहे. आता या सर्वांचे रक्षण करावयचे हे काम कठिण आहे, प्रेरकत्व निराळे, संरक्षकत्व निराळे. कार्यरुपाने भेद झालेला आहे. प्राणतत्व एकच आहे. म्हणतात. परन्तु वेगवेगळी कार्ये केल्यामुळे स्थान भेदाने, कार्य भेदाने पंचप्राण भेद झालेला आहे अस शास्त्रकार सांगतात. त्या प्रमाणें ईश्वराचा भेद हा उपाधिमुळे आहे

आता पचमहाभुतांपासून सूक्ष्म शरीरहि झालेले आहे. स्थूल शरीरही पांचभौतिकच आहे. पण स्थूल शरीराची कालमर्यादा ठरलेली आहे ते विनाशी आहे. अंतवंत इमे देहाः असे म्हणतात साक्षात्कारात्मक भक्तियोग जरी उत्पन्न झाला तरीसुद्धा सूक्ष्म शरीराचा विनाश होतो असे कपिल महामुनि सांगतात भक्तितत्वाचे प्रतिपादन आपल्या मातेला करीत असताना भक्तिचे स्वरूप त्यांनी वर्णन केलेले आहे सर्व देव म्हणजे सगळी इंद्रिये. सर्वही इंद्रियांची प्रवृत्ती वासुदेवाकडे असणारी तो भक्तियोग म्हणून त्यांनी वर्णन केला आहे. सर्वात्मक परमेश्वराच्या ठिकाणी या सर्वांची प्रवृत्तीं असण ही भक्ति आहे

## सत्व एवैक मनसः भक्ति स्वाभाविकीतुसः

ससार निवृत्ती सूक्ष्म शरीराचा नाश झाल्यावर होते. जीवनभाव संपतो तो पर्यंत अध्यस्त सर्वही सुक्ष्म शरीर घेऊन जीवात्मा राहातो आहे. त्याची सगळी कार्ये आपल्या ठिकाणी घेतो आहे ज्ञानात्मक, साक्षात्कात्म जो भगवत् भक्ति आहे, शेवटची म्हणा किंवा अशा प्रकारची, सर्व इंद्रियांची प्रवृत्ती त्या ठिकाणी लागणे म्हणजे ती ज्ञान पर्यवसायिनी झाली. तो पर्यन्त ही सर्व इंद्रियें, मन, बुद्धि प्राण वगैरे भौतिक असून सुद्धा रहात असतात ना ! परिणाम सारखा चालू आहे. इंद्रियांच्या वृति आहेत. मनाच्या वृत्ती आहेत. बद्धिच्या वृत्ती आहेत, प्राणाच्या वृत्ती सारख्या चालू आहेत हा परिणाम चालू असूनसुद्धा क्षय नाही. परिणाम असल्यामुळें सगळ्याचा क्षय आहे हा सिद्धांत जो साख्यांनी मांडला आहे तो तिथे का नाही ? परिणामशील असे हे सूक्ष्म शरीर आहे. तरीसुद्धा त्याचे रक्षण करणारे कोणी तरी असले पाहिजे ते चिंतन महाराजांनी केले आहे

## प्राणेंद्रियहृद् बुद्धि प्रसिद्धगणरुपं ।
## रक्षति तस्मात् गणपतिरिति विश्रुतरुपम् ।।

ईश्वरस्वरुपाचे हे एक कार्य इथे त्यांनी दाखिवलेलें आहे सपूर्ण सूक्ष्म शरीराचे सरक्षण करणे. तदंतर्गत बुद्धी यथायोग्य प्रेरणा कारण हे सवित्ररुपी ईश्वराच कार्य आहे प्रपच, परमार्थ या सर्वांच्या योगक्षेमाची जबाबदारी त्यात सुचिवलेली आहे बुद्धिदान करणे म्हणजे पूढचे सगळे आलेच कि नाही ! बुद्धिनेच सर्व कार्ये व्हायची आहेत ना ! सर्वाला कारण म्हणजें बुद्धीतत्व आहे. असा सांख्यांचाही सिद्धान्त आहे.

## सर्वं प्रति उपभोगं यस्मात सार यति बुद्धी ।
## सैव च निजदृष्टीनां प्रधान पुरुषन्तरं सूक्ष्मं ।।

उपभोग आणि अपवर्ग हे दोन्ही देणारी बुद्धि आहे सध्या बुद्धि हीच प्रधान आहे. ये बुद्धे परतस्त: मानण्याची जरुरी नाही, वगैरे विचार ऐकतो आपण. बुद्धी श्रेष्ठ आहे. हे सांख्यांनी सुद्धा सांगितलेले आहे. त्यांना ती बुद्धि मान्य आहे. भोगदातृत्व फक्त बुद्धीलाच आहे ना ! आणखी अपवर्ग अमोल दातृत्व सुद्धा--

## प्रधान पुरुषांतरं सूक्ष्मं करोति इति बुद्धिः ।

प्रधान आणि पुरुष यातील भेद म्हणजे अंतर दाखविणारी बुद्धिच आहे. तो भेदाग्रह झाला कि भेदग्रह गेलाच, भेदाग्रह मूलं सर्वंही । भेदाग्रह मूल सर्वही म्हणजे भ्रांती -- तीही गेलीच म्हणतात. म्हणजे भोग अपवर्ग दातृत्व बुद्धिला सांख्यशास्त्रकारांनीही मान्य केलेले आहे.

परन्तु ती बुद्धि संस्कृत झाली पाहिजे एवढेंच त्याचे म्हणणे आहे आचार्य महाराज म्हणतात दोषापनेनं आणि गुणाधानेन असा संस्कार करण्याकरता सर्वही साधनाचे आचरण केले पाहिजे. एवढच, दुसर काहीही नाही बुद्धीनेंच निर्णय व्हायचे आहेत. साक्षात्कार म्हणजे बुद्धिलाच आहे विद्या भगवती म्हणून जे देवांनी वर्णन केले आहे ही ब्रह्म विद्या आहे. ही साक्षात्कारात्मक वृत्ती भगवतीचे स्वरुप आहे म्हणजे बुद्धिनेंच सर्व संसारनिवृत्ती होऊ शकते. अशा या सर्वही तत्वांचे संरक्षण करणारे ईश्वरस्वरुप ह्मणजे गणपति आहे हे ध्यान करताहेत ( महाराज. )

**पार्णेंद्रिहृद् बुद्धिप्रसिद्धगणरुपं ।**
**रक्षति तस्मात् गणपतिरिति विश्रुतरुपम् ।।**

बाह्य आकाराचे, रुपाचे, अवताराचे चिंतन केले नाही. मूळ स्वरुपापर्यंत जाऊन चिंतन त्यांनी केले आहे.

जगदंबेचे स्वरुप चिंतन करतानाही महाराज सांगताहेत -

**मानसमुखजडजातंयद्भासा रूपं ।**
**भाति श्रुतिरिति देवी नगतन्यारुपं ।।**

मनापासून बाहेंर पर्यंन्त हे सर्व जड आहे. अचेतन आहे. प्रकाश नाही त्याला हे संपूर्ण अचेतन अस विश्व ( मनापासून बाहेर पर्यन्त सर्व ) ज्या प्रकाशान भासत आहे तो प्रकाश म्हणणे नगततया आहे. चैतन्य रुपाने सर्वांना भासक अशा प्रकारच भगवतीच स्वरुप आहे. भासल पाहिजे ना ! आता ते कस भासल पाहिजे. काय भासल पाहिजे ही बुद्धीला प्रेरणा सवितारुपाने होणार आहे. ती बुद्धि स्थिर राखण्याच काम गणपतिरुपाने केलेल आहे पण अगोदर त्या मूळ पदार्थाच भान झाल पाहिजे ना ! त्या मूळ पदार्थाच्या अस्तित्वाला मान्यता मिळायला ज्ञानाची जरुरी आहे. ज्ञानाशिवाय अस्तित्व नाही. शशशृंगांच ज्ञानच नाही. अर्थात

त्याला काही अस्तित्व नाही तर ह्या सर्व स्वरुपाचे एकत्वाने चिंतन करीत असताना भासक म्हणूनच चिंतन केलेले आहे. कर्तृत्व यात काहीच दाखवलेल नाही. प्रेरकत्वसुद्धा भासकच आहे. त्या त्या कर्माचे फल भासविणे किंवा इंद्रियाना तिकडे प्रवृत्त करणे. अशा सर्वही जडजाताला भासमान करणारी जी चितीशक्ति आहे ती नगतनया देवी आहे.

त्या नन्तर भगवान शंकरांच्या स्वरुपाचे प्रतिपादन करीत असतना महाराज लिहिताहेत--

**एकादशसुखभासकमीशस्य हि रूपं ।**
**श्रुतिसिद्ध शंकरा इति भवहारकरुपम् ।।**

महाराजांची भाषा फार गूढ आहे त्या भाषेचा अर्थ समजणें म्हणजे "ददामि बुद्धि योगंत" या कृपेशिवाय होणार नाही. एकादश इंद्रिय आहेत दशेंद्रिये व मन -- बुद्धि एकच मानलेल आहे अंत:करण म्हणून, सिद्धान्त दृष्टया ! याच्या पासून निर्माण होणाऱ्या ऐंद्रियक सुखाना भासक असे जे तत्व आहे ते शंकररूप आहे.

सर्वत्र सच्चिदानन्द परमात्मा एकच आहे अस शेंवटी उपसहारामध्ये सांगताहेत महाराज सुखाना भासक अशी परमात्म्याची वेगवेगळी स्वरुपे आहेत. अंत:करण विशेय सुख आहेत. असा सांख्यांचा किंवा वेदांत्यांचा सिद्धांत आहे. वृत्यात्मक सुख आहे. नैय्यायिकानी सुख दुख: वगैरे आत्मगुण मानलेले आहेत. म्हणजे आत्मा ज्ञान असेल तेव्हा पूर्ण मानलेला आहे. ज्ञान नसेल तेव्हा आत्माही जड अस सांगितल्या सारख आहे. ह्मणून हे ज्ञान, सुख दुख वगैरे सर्व मनोधर्म मनोधर्म मनोवृत्त रूप आहेत. असा सांख्यानी सिद्धांत मांडला आहे. उपनिषद् प्रतिपाद्य तोच आहे, ही सर्व मनोरुपे आहेत.

या पैकी शंकराचं कार्य म्हणजे इंद्रियांनी घेतली जाणारी जी एकादश सुखे आहेत त्या त्या विषयाशी संबंध वगैरे सर्व आले. अंता त्या त्या विषयांशी मनाचा संबध येण वृत्ती होण हें प्रेरकाच कार्य चाललेलच आहे. संरक्षण कार्य गणपतिच चाललेंल आहे. त्याच भान करणे, प्रकाश करणे हें नगतनयारुपाने चाललेल आहें. परन्तु ते सुखरुपाने परिणत झाल्या नंतर सुख भासविणें, मनाचा साक्षात संबंध चैतन्याशी आहे. अहंकार, बुद्धि, मन या रूपाने जें अंत:करण झालेल आहें, त्याचा साक्षात पहिला अध्यास म्हणजे, अंत:करण अध्यास आहे चित्ग्रंथी किंवा चिदचित् ग्रंथी म्हणतात त्याला तिथ पर्यन्त सगळ घालविता येत.

परन्तु चिद्चित् ग्रंथींचा भेद होण अतिशय कठिण काम आहे. चांगदेवासारखे जिथे सापडले. त्याचा ग्रंथी भेद होऊ शकला नाही. सर्वही परमात्मा एक आहें अस ज्ञान असून सुद्धा चांगदेव, ज्ञानेश्वर माझ्यापेक्षा कनिष्ठ आहेत मी त्यांच्या पेक्षा ज्येष्ठ आहे ह्या

गोंधळात त्या चिदचित् ग्रथींचा भेद न झाल्यानेच सांपडले वास्तविक ते मृत्युंजय झालेले. ज्यांनी चौदा वेळा मृत्यु चुकविला त्यांना सुद्धा विवेक झाला नाही भेद म्हणजे विवेक !

तर सुखभासक असे जे स्वरुप आहे ते शंकरांच रुप आहे. सर्वही सुख ही भास्य आहेत अर्थात विनाशी आहेत विवेक ज्ञानाचे फल म्हणजे विनाशीत्वाचे ज्ञान आणि विनाशीत्वाचे ज्ञान म्हणजे वैराग्य आहे. भास्य म्हणजे कदाचित् भास्य आहे सर्वदा भास्य नाही कारण त्यालाही कारणे असणारच तेव्हाच भासणार.

**मात्रा स्पर्शा त्सुकौंतेय शीतोष्णसुख दुःखदाः ।**

इंद्रियाचा आणि विषयाचा संबध आला म्हणजे सुखदुःखादिक उत्पन्न होतात, कारण कदाचित् काहे अर्थात कार्यही कदाचित काहे कारणातही भासक आहे चैतन्यस्वरुप कार्यालाही भासक आहे पण कार्यकारणरुपात सर्व असल्यामुळे ते विनाशी आहे. अर्थात ते त्याज्य आहे भासक जे सुख आहे मूळ सुख म्हणजे चैतन्य सत्‌चित् सुख हें भासक जे आहे ते शंकरस्वरुप आहे म्हणूनच शेवटी सांगितलं—

**एकादशसुख भासकर्माशस्य हि रुपं ।**
**श्रुतिसिद्धं शंकर इति भवहारकरुपम् ।।**

शंकर हे संहारकर्ते आहेत असं म्हणतात. संहार करायचा म्हणजे काय ? भवहारकं ज्या वेळेला संपूर्ण एकादश इंद्रियाच्या रूपाने निर्माण होणारी सर्व सुखे भासू लागतात. त्या पैकी भास्य आणि भासक हा विवेक ज्या वेळेला होईल त्या वेळेला भव संपला.

भव असून त्याची विरक्ती ही प्राथमिक भूमिका आहे. वितरेकसंज्ञा, एकेंद्रियसंज्ञा, वशीकारसंज्ञा आशा ज्या वैराग्याच्या योगशास्त्रकारांनी भूमिका सांगितल्या आहेत त्यात भास्य भासक हा बदल लक्षात आला, हा जर विवेक झाला आणि भास्याचे विनाशित्व जर पटल तर ते हरण व्हायला सुरवात झाली. आणि भासकाच्या ठिकाणी वृत्ती स्थिर झाल्यानन्तर काहीच नाही. अविद्या सहकार्येन नासित आस्ती भविष्यति । आत्मतत्वज्ञान झाल्याबरोबर अविद्या व अविद्येचे कार्य नास्ती. कोणच्याहि कलामध्ये त्याला अस्तित्वच नाही.

भगवान् शंकर हे भवहारकरूपम् म्हणतात. हे भव म्हणजे उत्पन्न होणारे जे संसार स्वरुप आहें, हे जे सुखस्वरूप आहें ज्या सुखाकरता सर्व संसार चाललेला आहे ! हे सगळेही भास्य आहे. भासकाचे चिंतन झाले पाहिजे केवळ भास्याचे चिंतन करणे हा दोष आहे. पण "हे विश्वची माझे घर" अशी जर ममता उत्पन्न झाली तर ती ममता गुरुरुप होणार आहे.

हा दोष नाही, तर या प्रमाणे क्रमाक्रमानें सर्वही भवहरण करणारे शंकरांचे स्वरूप असे आहे कि ते सुखभासक आहे ज्या सुखाकरता सर्व प्रयत्न चाललाय त्या सुखाच स्वरुप कस आहे तर ते विनाशी आहे. विवेकाने हे समजून घ्यायला पाहिजे. म्हणून भगवान् शंकरांच कार्य म्हणजे भवहरण करणे सगळी सुखच मूळात जाणारी आहेत मग त्याची कार्यकारण, सगळा एकंदर प्रपंच तसाच आहे.

आता भगवान् हरिचे वर्णन करताहेत महाराज--

मानससुखदुःखानाम् हारकमजरुपम् ।
हरिरिति वेदो ह्यवदत्सच्चित्सुखरुपम् ।।

असा शेवटचा उपसंहार आहे. तर, हरिस्वरुपाचे वर्णन करीत असताना 'हारक' असेच केले आहे. "भवहारक' अस शंकराच स्वरुप आहे भास्य भासक भाव विवेकव्दारा प्रगट करून. ता विवेकवृत्ता बुद्धिप्रेरक सवितारुपाने दृढ करुन या वैराग्य भूमिका, क्रमानें प्रदान करुन सपूर्ण भव हरण करण हे जस कार्य शंकराच आहे त्या प्रमाणे हरिचे कार्य दाखविताना सूद्धा--मानससुख दुःखानाम् हारक हरिः-सुखदुःख वगैरे सगळ्या ज्या मनोवृत्ती आहेत त्या सगळ्याही मनोवृत्तीच हरण करणारी 'हरि' देवता आहे. हरिर्हरति पापानि हरिति च हरः हरति च हरिः । दोन्ही व्युत्पत्ती एक आहेत. सर्वही पातकांचा नाश करणारी हरि शक्ति आहे ते ईश्वराच कार्य आहे मानस सुख दुःखांच हरण करणारी हरि शक्ति आहे. म्हणजे हरिस्वरूप परमात्मा मानस सुख दुःखांच हरण करीत असतो मनाची वृत्ती त्या सुख दुःखाकडेच लागली व त्याच्या अनुसंधान ( जे विनाशी) मुळे जास्ती जास्ती सुखापेक्षा दुःख वृत्तीच उत्पन्न होत आहेत मानस सुख दु.खानाम् हारक अज सच्चित् सुख रुप मूळ स्वरुप आहे त्याला हरि म्हटलेल आहे. म्हणून त्या दुःखवृत्तींना हरण करुन, भास्य भासकभाव विवेक प्रदान करुन त्या विवेकाच्या ठिकाणी बुद्धिला प्रेरणा करुन तिथ स्थिर करुन अशा रीतीने भवहरण करणे हें शंकररुपी परमात्म्याचे कार्य आहे. इथे मानस जे सुख दु ख आहे त्याच हरण करण्याचे कार्य चालले आहे. म्हणजे अद्यापि मानसाचे संरक्षण आहे दुसऱ्या कोणत्याही भूमिकेमध्यें जीवात्मा असताना सर्वही सूक्ष्म शरीराच्या संरक्षणाचे कार्य चालले आहे गणाचे पालन करण परन्तु आता सर्वही सुख दुःख वृत्तींचा लय होतो आहे. ज्या वेळेला अन्नमय, मनोमय, प्राणमय, विज्ञानमय, आनदमय याच्याही पलिकडे ते मन या वेळेला गेल, प्रेरणा करणाऱ्या सवित्ररुप ईश्वरानें प्रेरणा करता करता तिथ पर्यन्त ती प्रेरणा झाली. सत्चित सुखापर्यन्त प्रेरणा आल्यावर मानसवृत्ती संपलेली आहे. उन्मनीवृत्ती उत्पन्न झाली आहें. समाधि अवस्थेची सिद्धी झाली आहे.

ब्रह्मज्ञान उत्पन्न झाल्यावर सूद्धा ते दृढ होण्याकरता तत्वज्ञान, मनोनाश, वासनाक्षय यांचा अभ्यास चालू ठेवला पाहिजे, म्हणतात म्हणून चौथ्या भूमिकेवर जरी ज्ञान झाल असल

तरी ५ वी आणि ६ वी आणि ६ वी भूमिका अद्यापि आहे व्युत्थानदशा त्याच्या मध्ये सुद्धा आहे. ७ व्या भूमिकेवर गेल्यावरही व्युत्थान आहे. तो पर्यंत ज्ञान झालेले असत. तरी सुद्धा समाधिला प्रतिबंध आहे ईश्वर प्राणिधानाने ज्ञान आलेले आहे परन्तु कार्य अद्यापि पुढे आहे ना ! अतराय मध्ये मध्ये येत आहेत त्यामुळे वासनाक्षय आणि मनोनाश होणे याची जरुरी आहे. त्या करता हरिस्वरुपाचे जे चिंतन करायचे आहे ते या रुपानें आहे -- मानस सुख दुःखानाम् हारकम् । द्वंद्वांना हरण करणारे म्हणजे मनोवृत्तींचाच उपशम झाला. वासना उपशम पूरक मनोवृत्ती उपशयमन होते तिघांचे ही समहित अभ्यास त्यावेळेला चालू पाहिजे म्हणजे ब्रह्मज्ञान झाल्यावर सुद्धा ईश्वर प्रणिधान पाहिजे, असे सिद्ध होते. म्हणजे ज्ञान दाढर्यांचा अभ्यास केला पाहिजे असे म्हणतात. कारण व्युत्थान होते ना ! समाधी अवस्थें-मध्ये जीवनन्मुक्त सौख्य आहे. काही नाही. द्वंद्वातील अवस्था आहे. पण सुषुप्ति अवस्थे प्रमाणे तीही अवस्था झाली ना ! काही काळ टिकणारी झाली. अद्यापि कर्म पारतंत्र्य सुटलेले नाही. ते कर्मपारतंत्र्य पूर्णपणे जाण्याकरता सर्वही मनोवृत्तींचा लय होणे याची जरुरी आहे. मनोनाश झाला पाहिजे. त्या शिवाय खरी समाधिसिद्धी झाली नाही. म्हणून ५ व्या, ६ व्या भूमिकेपर्यन्त हा अभ्यास आहे.

सदाशिव ब्रह्मेंद्रांची गोष्ट सांगतात. ते ५ व्या ६ व्या भूमिकेपर्यन्त गेलेंले होते. आधी मोठे विद्वान नन्तर योगी मोठे झालेले. ब्रह्मज्ञानी. पण ब्रह्मज्ञान झालेले असले तरीसुद्धा व्युत्थानदशा आहे. टिपू सुलतानाच्या वेळी ते होऊन गेले अस सांगतात. ते असेच एकदा बाहेर पडले. जंगलातून चालले होते. त्या ठिकाणी कोणी एक मुसलमान सरदार शिकारीला आला त्याचे तंबू ठोकलेले होते. त्यात जनाना होता. ह्यांना काहीच भान नाही अंगावर वस्त्र नाही एका तंबूत आत शिरून दुसऱ्या बाजूने बाहेर पडले. हे पाहिल्यावर तो मुसलमान सरदार रागावला. आणि तलवार उपसून ह्यांचे दोन्ही हात छाटून टाकलें. तरी सुद्धा यांना काहीही भान नाही. त्याला मागाहून पश्चाताप झाला. ह्यांच्या मागोमाग तो जाऊ लागला. एका झाडा जवळ आल्यावर हे थांबले. व्युत्थान होऊन त्यांनी डोळे उघडले. समोर त्या सरदाराला पाहून त्यांनी विचारले, "का, बाबा कशा करता आलास ?" तो म्हणाला, "महाराज माझ्या कडून अपराध झाला. मी आपले हात तोडले" हे म्हणाले, " कुठे, काही नाही दोन्ही हात आले श्रृंगेरीच्या आचार्यांनी त्याचे स्तोत्र केले आहे.

त्याची पूर्वीची अवस्थाही एका सुभाषितात वर्णन केली आहे. मोठे योगी होते, ज्ञान झाले होते, तत्वज्ञान, मनोनाश, वासना क्षयाचा अभ्यास पुढेहि का चालू ठेवला पाहिजे हें पटवून देण्याकरता ही गोष्ट सांगतात. सदाशिव ब्रह्मेंद्र एकदा गावाबाहेर एका शेतात पडले होते म्हणतात पण त्यानी आपले डोके एका मातीच्या ढेकळावर ठेवले होते. गावातली काही मंडळी त्यावेळी तिकडून चालली होती. ह्यांना बघून ती म्हणाली, "हा योगी मनुष्य. याला उशाला कशाला पाहिजे ?" आता ह्यांनी काय उशी आणली होती का उशाला घरातली. आपले मातीच्या ढेकळावर डोके ठेवले होते. तरी ते लोक बोललेच आणि पुढे गेले.

ह्यांनी ते बोलणे ऐकले वाटते. वृत्तीचा उपशम अद्यापि झालेला नव्हता. ते सबंध मातीच ढेकूळ डोक्याखालचे ह्यांनी काढून टाकले आणि तशीच मान अधांतरी ठेवून निजून राहिले. तेवढ्यात ती मंडळी तिकडून परत आली आणि ह्यांना अशा अवस्थेत पाहून म्हणाली, " याला एवढा तरी अभिमान कशाला पाहिजे? काय आम्ही एवढ बोललो तर काय झाल ?" म्हणजे उशाला घेतल तरी चूक न घेतल तरीं चूक आचार्य म्हणतात श्लाघावारवधूटिचे हें दास होतात. त्याना सुद्धा श्लाघा करुन दाखवावेसे वाटते पुढे काही नाही ममता नाहीच. शरीराचे भानही नाही. म्हणजे या भूमिकेपर्यंत गेलेले आहेत तत्व साक्षात्कार झालेला आहे. तरी सुद्धा अद्यापि प्रारब्धकर्म आहे. उत्थानदशा होते आहे, आता त्या प्रारब्धकर्माच्या वेळेला विवेक, वैराग्य, चिकित्सा दाढर्यहि त्यांचे असेल अथवा मिथ्यात्व बुद्धि दाढर्य झाल्यामुळेही त्यांना तितिक्षा दाढर्यभूत असेल मिथ्यात्व बुद्धि झाली पाहिजे ना ! द्वंद्वातील अवस्था म्हणजे द्वैतभाव होऊन द्वंद्वातीत होण हीं अतिशय कठिण आहे द्वैतभान होत असेल तर पुन्हा मनोवृत्ती तिथे गेली, तर काय करायच ? काही सांगता येत नाही.

म्हणून हा अभ्यास त्यांनाही सांगितला आहे त्यात ईश्वर प्रणिधानाचा अभ्यास त्याचाही असला पाहिजे ज्ञानाच्या वेळेला सुद्धा ईश्वरभक्तिची जरुरी आहे अस शास्त्रकार सांगतात. ज्याने आपल्यावर इतके उपकार केले आहेत त्याला विसरणे हा कृतघ्नता दोष आहे आणि जरुरीही आहे पुन्हा पुन्हा उत्थान होतय अद्यापि कर्म पारतंत्र्य आहें, तरी सुद्धा क्षियन्ते च अस्य कर्माणि सुद्धा प्रारब्ध व्यतिरिक्त असच म्हटल आहे आवदेव चिरम् उपनिषदांनी तेवढा विलंब आहे म्हणाले.

तर मानस सुखदुःखानाम् हारकम हे हरिचे स्वरुप आहे आत्ता पर्यंन्त केलेले प्राणिधान हे या वेळेपर्यंन्त चालू असल पाहिजे, पद्मपादाचार्यांना आचार्य महाराजांनी तीन वेळेला प्रस्थानत्रयी सांगितली होती ते आचार्यांचे पहिले शिष्य होते, त्यांना काय ब्रह्मसाक्षात्कार व्हायचा राहिला असेल काय ? परन्तु त्यांची नृसिंहाची भक्ति कायम होती त्यामुळे आचार्यांना मारण्या करता उग्र भैरव येतोय हे त्याना दिसले म्हणून ते नृसिंहरुप धारण करुन गेलें आणि भैरवाला मारले सन्यासी असुन सुद्धा हिंसा अहिंसा असा विवेक नाही. पूर्ण द्वंद्वातील अवस्थाच त्याना मिळाली. उपास्य रुप होणे. त्यांची उपासनाही चालू आहे. पण पूर्ण मनोनाश जर झाला, नाही उन्मनी अवस्था प्राप्त झाली नाही, समाधि सिद्धी कायमची झाली नाही तर त्या बद्दल सुद्धा कथा दिलेली आहे शांकर विजया मध्ये.

आचार्यांचा आपला सकाळच्या वेळेला प्रस्थानत्रयीचा पाठ चालायचा. ही मोठी मोठी मंडळी सर्व शास्त्र निष्णात. उपासनाबलही आहे "ददामि बुद्धि योगतं" हे ही बल मिळालेंले आहे. ईश्वराची कृपा पूर्ण आहे हे सगळ आहे गुरुभक्ति आहे. त्यांचा गिरी नावाचा एक शिष्य होता. केवळ भक्ति आहे. गुरुंच्या ठिकाणी पूर्ण श्रद्धा आहे आपल्या सद्गुरु महाराजांची सेवा चालली आहे एके दिवशी सगळी शिष्य मंडळी पाठाला येऊन बसली. ते गिरी

यायला थोडा वेळ लागला नदीवर गेले होते छोटया वगैरे धुवून कमंडलू भरून पाणी घेऊन येत होते बाकीच्या मडळींनी विचारले दाठ सुरु करायचा का गुरु महाराज ? आचार्य म्हणाले, थांबा तो गिरी येऊ दे कि पद्मपादाचार्य त्या वेळेला म्हणाले, भिंतीकडे बोट दाखवून "काय, गिरीची प्रतिक्षा करायची ?" म्हणजे भिंत आणि गिरी सारखेच. त्याला काय कळत हे जेव्हा पद्मपादाचार्यांचे आचार्यांनी पाहिल त्या वेळेला काही बोलले नाहींत आचार्य

इथ पर्यन्त बुद्धिदान मिळालेल आहे ईश्वर कृपा आहे गुरु कृपा आहे. सगळ ज्ञान आचार्यांच्या मुखातून मिळाल आहे. परन्तु गिराबद्दल हा जो अनादर त्याच्या मुखांतुन निघाला. गिरी नदीवरुन परत येत असतानाच आचार्यांनी सर्व विद्या त्याला संकल्पशक्तिने देऊन टाकल्या. आणि ते गिरी जे आलें ते

भगवन् उदधौ सुखदुःखयते ।
मिती जन्म जवे सुखदुःख यशे ।
फलितं यशितं ।

अशी त्रोटक वृत्तांतात स्तुति करतच आले. मनानेंच शक्ति त्याला देऊन टाकली. किंवा त्याची शक्ति जागृत केली शक्तिपात त्याच्या वर केला पात याचा अर्थ शक्ति जागृत होण आचार्यांच्या मानसिक संकल्पशक्तिनेच त्या गिरीची शक्ति जागृत झाली. सगळा वासनाक्षय झाला सगळ झाल आणि एकदम त्यांना वरच्या भूमिकेवर घेऊन गेलें तर अशी ही लोकोत्तर गुरुशक्ति आहे देवाने जरी बुद्धि दिलेंली असली तरी सुद्धा सगळ कार्य चाललेंल आहे अनष्ठान चाललेंल आहें पण उन्मनिभाव होऊ शकत नहीं मनामध्ये व्युत्थानदशेत असे विकार उत्पन्न होण्याचा संभव असतो

सातव्या भूमिकेपर्यंन्त जाईपर्यंन्त हे सर्व (अभ्यास) चालू राहिलें पाहिजेत. ते कार्य करायचे म्हणजे "मानससुख दुःखान्, हारकम्" हे कार्य शेवटपर्यंन्त चाललेल आहें. "क्लेशकर्मविपाशकैः अपराविष्ठ पुरुष विशेष ईश्वरः." योगसुत्रकार म्हणतात

काहीहि संबंध नाही पण हा संबंध ठेवला पाहिजे ना ! शक्ति काही तरी आहे, त्या शक्तिचे कार्य दाखिवले पाहिजे. शेवटी जी शक्ति शक्त्या प्रसन्नास्ति या रुपाने अद्वैत सिद्धांत मान्य करावा लागतो किंवा ते पृथकत्वही नाहीसे होते या शक्तिचा कार्य संपादन करणारा जीवात्मा जगाचा द्रष्टा, दृश्य हे सगळ एकदमच जाणार आहे, हे जायचे म्हणजे कृपा पाहिजे ना ! अभ्यासदशेमध्ये आहे अद्यापि ब्रह्मज्ञान झाल्या नन्तर सुद्धा. फलप्राप्तिला अंतराय येतात मध्ये मध्ये सर्वमिथ्यामिथ्यात् बुद्धि दाढर्यानि काम क्रोधादि विकार त्या बद्दल काही त्यांच्या मनावरती परिणाम होणार नाही. गुणागुणेषु वर्तते इतिमत्वा--हे ज्ञान त्यांना

साध्य झालेल आहे. त्यामुळे त्यांच्या मनात आसक्ति किंवा आग्रह राहाणार नाही. परन्तु एखादा विकार उत्पन्न होतो. त्याचे कार्य मात्र जगामध्ये दिसते.

म्हणून, हरिचे कार्य त्यानी दाखिवलेल आहे आणि शेवटी प्रार्थना केली आहे. हे सद्चित् सुखरुप म्हणजे सर्व भासक आहे त्रिकाला बाधित आहे. इतर सर्व भासक त्रिकाला बाधित आनन्दरूप आहे. ज्याची ज्याची अपेक्षा आहे. काल मर्यादा नको आहे. त्याच प्रमाणें नित्य प्रकाश असला पाहिजे. आणि आनन्दही असला पाहिजे एवढीच अपेक्षा आहे त्या मूल स्वरूपाच्या चिंतनामध्ये माझी बुद्धि रहावी आणि त्याचे ध्यान करता करता ही मंदावली सगळी दूर होते म्हणून उपक्रमातही त्यांनी सांगितले आहे--

## जय सावित्रगजमुखनगतनये ईश हरे ।-

असे ध्यान केले आहे. पंच आयतने म्हणजे ही अशी आहेत. एकच ईश्वर आहे पण जीवांच्या करता ही भिन्न भिन्न कार्ये चालू आहेत सृष्टीला जं वाचे कर्मही त्यांनी निमित्त कारणामध्यें मानले आहें काल कर्म, अविद्या शक्ति ही आहेतच. जीवाची कर्मे जर घेतली तर त्या कर्माप्रमाणें फल देण्याकरता हे सगळ कार्य चालू आहे.

म्हणून अस जरी कर्म चालू असल तरी त्याच सत्चित् सुखरुपत्व कायम आहें. आचार्य महाराजांनी सूत्रभाष्याच्या उपक्रमातच हे दोन्ही वर्णन केलेल आहे, --सर्वज्ञ सर्व शक्ति समान्वितंचा नित्य शुद्ध बुद्ध मुक्त ब्रह्म शब्दस्यहि -- म्हणतात. ब्रह्म शब्दाचीच व्युत्पत्ती करायला लागलेल असताना ते नित्य आहें नृहभेदबुद्धि त्याची बुद्धि त्याचे महत्व इतके आहें कि बाकी सर्वही अनित्य आहे. हे मात्र नित्य आहे. तेव्हा अनित्यत्वापेक्षा अत्यत भिन्न आहे. कालमर्यादा नाहीं हे महत्व नित्य या शद्वाने ब्रह्मत्व सांगितलेल आहे. हे शुद्ध आहे बाकी सगळ अशुद्ध आहे बुद्धि ज्ञान स्वरुप आहे, मुक्त आहे. अस असून सुद्धा सर्वज्ञ सर्व शक्ति समन्वितंच म्हणताहेत आचार्य कार्य करायच आहे ना ! जगत् कार्य करायच आहे त्या करता ते सर्वज्ञ आहे व सर्व शक्ति समन्वित. सगुण व निर्गुण तेच आहे. निराकार असून साकारही तेच आहे

बुद्धिवादी ही पुष्कळ म्हणतात निराकाराला आकार कसा येतो ? अग्निला आकार कुठे आहे ? पण अग्निला काष्ठाचा आकार येतो कि नाही ! जळाला आकार कुठ आहें. पण जस आळ कराव तसा पाण्याला आकार येतो कि नाही ! तस निराकार ईश्वराला आकार दिला म्हणून बिघडल कुठे ? तो काही स्वाभाविक आकार नाही. औपाधिक आहें. तुज सगुण म्हणू कि निर्गुण रे--- ज्ञानेश्वर महाराज म्हणतात दोन्ही एकरुप आहेत एकत्वाच्या अनु-संधानामुळे शोक मोह सगळे दूर होतात सोळा हजार स्त्रिया त्यांची मुल बाळ, एकंदर सर्व यादवकुल नष्ट झाल असताना सुद्धा ( भगवंताला त्याच ) काही नाही. को मोहः कों शोकः

एकत्व अनुपश्यत: म्हणून सगळेही मनोविकार, सर्व द्वंद्वांची निवृत्तीही त्याच ईश्वराकडून होते आहे.

हरि स्वरुपाचे द्वंद्व निवृत्तीचे काम चालू आहे. सुखभासक स्वरुपाने भास्य भासक विवेक प्रदान करुन भास्याच अनित्यत्व पटवून वैराग्य दृढ करण्याच कार्य शंकर रूपाने चाललेल आहे. सर्वही एकदर जे भास्य पदार्थ आहेत त्याच भान होणे हे कार्य नगतनया रुपानें चाललेल आहे भौतिक शरीरापासून सूक्ष्म शरीराचे संरक्षण शेवटपर्यन्त करण्याचे कार्य गणपतिरुपाने चाललेल आहे. आणि तशी तशीं बुद्धि देऊन त्या त्या साधन भूमिकेवर त्या जीवाला नेण; कर्मपरतंत्र जीव असताना सुद्धा त्याला तशाच कर्मांचा विशेष आणखी त्याच्यावर कृपा करून सर्व योगक्षेम निर्वाह बुद्धि त्याला प्रदान करण हे कार्य सवित्र रूपाने चालू आहे.

एक ईश्वर आहे घरामध्ये असलेले दिवे ज्या वीजेवर चालतात आगगाडीला जोडलेले इंजिनही त्याच वीजेवर चालत. ज्या ज्या ठिकाणी अशी कार्ये चालतात तिथें एकच वीज आहे. तेज एकच आहे. तशी निरनिराळ्या कार्याकरतां वेगळी वेगळी कनेक्शन केलं असली तरी वीज एकच आहे. इथली जरी वीज सकाळी गेली तरी इंजिनाला मिळणाऱ्या वीजेचे कार्य चालूच आहे. तस सर्वही इंद्रियांच्या देवता जरी वेगळ्या असल्या तरी त्या सुद्धा जीवरुप आहेत. त्या देवांनाही तशाच प्रकारची बुद्धि पाहिजे आहे. सर्व भान, सर्व संरक्षण करण प्रेरणा करण, विवेक वैराग्य प्रदान करण आणि शेवटा सर्वही मनोवृत्ती थांबवणे, नाहीशा करणे अशी सगळी जीवाला अपेक्षित असलेली सर्व कार्ये करण्याकरता एकाच ईश्वररुपाने कार्य चाललेल आहे. अस या आरती मध्ये महाराजांनी चिंतन केल आहे.

कायेन वाचा मनसेंद्रिये वा ---

# अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त

नागपूर

